**प्रेस नोट** **दिनांक ०९/३/२०१९**

**खडक पोलीस ठाणे**

**जागतिक महिला दिनाचे दिवशी महिलेचा हरवलेल्या महागडया मोबाईल फोनचा शोध घेऊन महिलेस परत**

दिनांक ०८ मार्च २०१९ या महिला दिनाचे दिवशी महिला नामे मयुरी वरखे, वय २५ वर्ष, शुक्रवार पेठ, पुणे हया गाडीखाना शुक्रवार पेठ,ते हडपसर पुणे असा रिक्षामधुन प्रवास करीत असताना त्यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन गहाळ झाला. सदरबाबत त्यांनी w.w.w.punepoliceco.in या वेबसाईटवर ऑनलाईन तक्रार नोंदविली होती. सदर महिला तक्रारदार हया श्री. राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खडक पोलीस ठाणे, पुणे यांना भेटल्या. महिला दिनाचे दिवशी महिलेचा मोबाईल फोन गहाळ झाला असल्याने सदर फोनचा तपास करणेबाबत सूचना दिल्या. खडक पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे कर्मचारी पोलीस शिपाई ९८६८ योगश जाधव, पोलीस शिपाई ८८२९ महावीर दावणे यांनी मोबाईलबाबतचा तांत्रीकदृष्टया तात्काळ तपास करुन, सदर महिलेस त्यांचा गहाळ झालेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन किंमत रुपये १५,०००/ मिळवुन दिला.

**(राजेन्द्र मोकाशी )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

